# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख या मतदारसंघांतील निवडणुकांमध्ये मतदान करण्याचे आवाहन...**

## जाहीर आवाहन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **१० अध्यापक** आणि कलम २८(२)(ध) अन्वये **०३ विद्यापीठ अध्यापक** अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ) अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे **०२ अध्यापक** विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील **०३ विभागप्रमुख** प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून देण्यासाठीची निवडणूक रविवार, दिनांक ०८ जानेवारी, २०२३ रोजी होणार आहे. सदर मतदान प्रक्रिया पारदर्शी पध्दतीने होण्याच्यादृष्टीने विद्यापीठाच्या निवडणूक विभागाने सक्षम यंत्रणा उभारलेली आहे.

शिक्षकांचे प्रतिनिधीत्व या अधिकार मंडळांवर देण्यासाठी या निवडणूका महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे शिक्षकांनी मोठया प्रमाणावर मतदान करुन या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. सदर निवडणूका या अत्यंत निष्पक्ष व गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येतात आणि यामध्ये मतदारांनी केलेल्या मतदानाची अत्यंत गोपनीयता राखली जाते. त्यामुळे मतदारांनी निर्भीडपणे व मोठया संख्येने मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१४
दिनांक : ०७ जानेवारी, २०२३